# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्पृश्यता विषयक विचार

**प्रा. एस. एस. मारकवाड**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,
सोलापूर.

भारतीय समाज व्यवस्थेची वीण जातीव्यवस्थेवर आधारित आहे. हिंदू धर्मग्रंथात यालाच वर्णाश्रम धर्म अथवा चातुर्वर्ण संबोधण्यात आले आहे. आज हिंदू समाजव्यवस्थेत जवळपास चार जाती आणि उपजाती आहेत. भारतीय समाजातील विभिन्न स्तरातील परिवर्तनाचे निर्धारण जातीच्या आधारावर होते. प्रत्येक हिंदू जातीमध्ये जन्म घेतो, त्याची ही जातच त्याच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक जीवनाचे निर्धारण करते. आणि या वर्णव्यवस्थेच्या बाहेर आहेत अस्पृश्य, ज्यांचा स्पर्श, ज्यांची सावली विशेषाधिकार प्राप्त जातीसाठी निषिद्ध मानली गेली. बाबासाहेबांच्या दृष्टीने जातिव्यवस्थेपेक्षा मोठी अपमानजनक सामाजिक संस्था अन्य होऊ शकत नाही.

गुलाम प्रथा आणि अस्पृश्यता या विषयावर बाबासाहेबांनी सविस्तर मांडणी करताना बाबासाहेब लिहितात की, अस्पृश्यतेवर लज्जित होण्याऐवजी हिंदू तिला नेहमी योग्य ठरविण्याचा प्रयत्न करतात. आणि समर्थनात तर्क देतात की, अन्य देशाच्या तुलनेत भारतात गुलाम प्रथा कधीही नव्हती आणि ही अस्पृश्यता कोणत्याही स्थितीत तेवढी वाईट नाही जेवढी गुलाम पृथा. २६ या तारकांचे उत्तर देताना बाबासाहेब म्हणतात की, गुलामी ही हिंदूंची एक अतिप्राचीन परंपरा आहे. यास हिंदूंचा विधीनिर्माता मनूने मान्यता प्रदान केली, तर नंतरच्या स्मृतिकारांनी तीस व्यापक आणि व्यवस्थित रूप दिले. जी इ. सन. १८४३ साली इंग्रजांना कायदा करून रद्द केली.

अस्पृश्यता आणि गुलाम प्रथा यात चांगली की वाईट याचे उत्तर देताना बाबासाहेब या दोन्ही प्रथांची तुलना करणे योग्य समजतात. त्यांच्या मते, यातील पहिले अंतर हे होते की, गुलामी प्रथा स्वतंत्र समाज व्यवस्था नाही मात्र अस्पृश्यता या व्यवस्थेचे अधिक कुस्थित रूप आहे. गुलामी कधीही अनिवार्य नव्हती पण अस्पृश्यता अनिवार्य आहे. गुलाम कायद्यात मुक्ततेचे विधान आहे पण अस्पृश्याच्या बाबतीत हे नाही एक वेळ अस्पृश्य म्हणजे सर्वकाळासाठी अस्पृश्य. त्यांच्या मते दुसरे अंतर हे होते की, अस्पृश्यता गुलामीचे एक अप्रत्यक्ष रूप आहे. आणि यामुळे ते कुत्सित आहे. गुलामाला त्याच्या स्वातंत्र्यापासून उघड आणि प्रत्यक्ष रूपाने वंचित ठेवले जाते. यामुळे गुलामाला आपल्या गुलामीची जाणीव राहते आणि ही जाणीवच स्वातंत्र्याच्या लढाईचे पहिले आणि अमोघ शस्त्र आहे. पण अस्पृश्यांची स्वतंत्रता अप्रत्यक्ष पद्धतीने हिरावून घेतली जाते यामुळे त्याला आपल्या गुलामीची जाणीवच होत नाही. म्हणजे अस्पृश्यता हे गुलामगिरीचे अप्रत्यक्ष रूप आहे. त्यामुळे ते स्थायी आहे. म्हणून या दोन्ही व्यवस्थेत निसंदेह अस्पृश्यता वाईट आहे.[i] या दोन व्यवस्थेतील फरक स्पष्ट करण्यासाठी बाबासाहेब शिक्षण, आदर्श, सुख, संस्कृती आणि समृद्धी या परिमाणांच्या संदर्भात तुलना करून स्पष्ट करतात की, गुलामीत वरील बाबींना संधी उपलब्ध आहे, मात्र अस्पृश्येतेत यापैकी कशालाही संधी नाही. गुलाम प्रथेसारख्या परतंत्र समाज व्यवस्थेत गुलामांचे भरण-पोषण, त्यांचे स्वास्थ्य हे मालकांचे दायित्व होते. तर

अस्पृश्यांना परतंत्र समाज व्यवस्थेच्या वरील सुविधा उपलब्ध नव्हत्या.[ii] बाबासाहेब अस्पृश्यतेला यासाठी क्रूर म्हणतात की, अस्पृश्यांना आपल्यासाठी रोजीरोटी कमविण्याचे दायित्व टाकले जाते मात्र रोजी कमविण्याचे दरवाजे त्यांच्यासाठी पुरस्थ पद्धतीने खुले नसतात. त्यांच्या मते , 'अस्पृश्य परतंत्र समाज व्यवस्थेच्या कोणत्याही लाभाचे अधिकारी असल्याचा दावा करू शकत मातीत, त्यांना स्वतंत्र समाज व्यवस्थेच्या सर्व आव्हानांना स्वतः तोंड देण्यासाठी स्वतंत्र सोडले जाते'[iii] कायद्यानुसार अस्पृश्य व्यक्ती स्वतंत्र आहे. मात्र सामाजिक दृष्टीने आपल्या व्यक्तित्वाचा विकास साधण्यासाठी त्याला कोणतीही स्वतंत्रता उपलब्ध नाही. हे विरोधाभास असण्याचे कारण म्हणजे तेथे धर्म गुलामा सोबत होते तर येथे धर्म अस्पृश्यांविरुद्ध आहे. हिंदू कायद्यात हे घोषित केले गेले की, अस्पृश्यांना कोणतेही व्यक्तित्व नाही.

हिंदू समाज व्यवस्थेतील अस्पृश्यांची सामाजिक स्थिती काय आहे? याचे प्रत्यक्ष चित्र प्रस्तुत करण्यासाठी बाबासाहेब खेड्याला हिंदू समाजव्यवस्थेचे मॉडेल म्हणून प्रस्तुत करतात. त्यांच्या मते यापेक्षा योग्य उपाय नसून हिंदूंचे खेडे हे त्यांच्या समाजव्यवस्थेची जणू प्रयोगशाळा असून, तेथे हिंदू समाज व्यवस्थेचे परिपूर्ण पालन होते. खेडे हे हिंदू समाज व्यवस्थेचे आदर्श रूप मानले जाते. तेथे त्यांची आपापली विधीपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका असते.[iv] प्रत्येक खेड्याचे दोन भाग असतात. स्पृश्यांची घरे आणि अस्पृश्यांची घरे, भौगोलिक दृष्टीने ती वेगळी असून एकमेकांपासून दूर असतात. अस्पृश्यांची घरे त्यांच्या जातीनुसार ओळखली जातात. कायद्याच्या दृष्टीने अस्पृश्यांची घरे गावाचा भाग असतात पण वास्तवात ते गावाच्या असतात. अश्या पद्धतीने खेड्यात स्पृश्य, अस्पृश्य नावाने दोन वेगवेगळी समूह राहतात, ज्यांच्यात कोणतीही समानता नसते. प्रत्येक खेड्यात स्पृश्यांची एक आचारसंहिता असते आणि त्याचे पालन अस्पृश्यांना करावे लागते. ही संहिताच त्या कार्यांना निश्चित करते त्यांना केल्याने अथवा न केल्याने अस्पृश्य लोकांना गुन्हेगार मानले जाते. आणि या गुन्ह्यासाठी शिक्षा मात्र सामूहिक असते.

हिंदू समाज व्यवस्थेतील अस्पृश्यांच्या स्थितीची स्पष्टता येण्यासाठी बाबासाहेब अस्पृश्य कोणत्या प्रकारे राहतात आणि ते आपली रोजी-रोटी कोणत्या प्रकारे कमावतात याची माहिती देतात. शेतीप्रधान देशात जीविकेचे प्रमुख साधन शेती असूनही सामान्यतः अस्पृश्यांना हे साधन उपलब्ध नव्हते, परिणामतः अधिकांश भागात ते भूमिहीन मजूर राहण्यासाठी विवश होते. आणि ते हिंदू शेतकऱ्यांसाठी त्याच मजुरीवर करण्यास मजबूर होते जी मालक त्यांना देई. मात्र जेव्हा पिकांचा काळ संपे तेव्हा त्यांच्याजवळ कमविण्याचे कोणतेही साधन नसायचे. त्याचप्रमाणे असे कोणतेही व्यवसाय नव्हते ज्या माध्यमातून ते रोजी रोटी कमावू शकत. म्हणजे उत्पन्नाचे हे सर्व साधन अनिश्चित आणि अस्थायी होते. हे स्पष्ट करून बाबासाहेब म्हणतात की, भीक मागण्याचा अधिकार हाच अस्पृश्यांचा परंपरागत अधिकार बनलेला आहे. ही विधी संमत भिक्षावृत्ती अस्पृश्यांसाठी एक प्रथा बनली आहे. खेड्यात स्पृश्यांद्वारा दिलेला आदेश हा कायदा आहे. स्पृश्यांविरुद्ध अस्पृश्यांना कोणतेही अधिकार प्राप्त नाहीत. त्यांना कोणतेही सामान अधिकार प्राप्त नव्हते आणि नाही कोणतेही न्याय ज्याच्याद्वारे त्यांना ते सर्व काही दिले जाऊ शकते जे त्यांना देय आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, ही व्यवस्था दर्जा आणि व्यवहार या दोन्ही दृष्टींनी पिढी अन पिढी चालत आलेली आहे. आणि ही कर्म अर्थात भाग्याचा अटळ सिद्धांतावर आधारित आहे. जी एका वेळी सर्वकाळासाठी निश्चित होत असते आणि ज्यात कोणतेही परिवर्तन होत नाही. या व्यवस्थेत कोणतीही व्यक्तिगत योग्यता अयोग्यतेला स्थान नाही. भारतीय खेड्यातील अतंर्गत जीवनाचे वरील चित्र स्पष्ट करून बाबासाहेब

लिहितात की, भारतीय खेड्याच्या या गणतंत्रात लोकतंत्र, समता, स्वातंत्र्य, बंधुत्वाला कोणतेही स्थान नसून, भारतीय खेडे हे गणतंत्राचे उलटे रूप आहे. जर हे गणतंत्र असेल तर स्पृश्यांचे आणि त्यांच्यासाठीच, हे गणतंत्र अस्पृश्यावर स्थापित हिंदूंचे एक विशाल साम्राज्य आहे. यात अस्पृश्यांना कोणतेही अधिकार नसून, ते या गणतंत्राच्या बाहेर आहेत. ते या हिंदू समाजापासून बहिष्कृत आहेत.[v]

ज्या व्यवस्थेत एवढ्या असमानता भरलेल्या आहेत ती आतापर्यंत जिवंत कशी आहे आहे? या पाठीमागील तत्व स्पष्ट करताना बाबासाहेब सांगतात की, हर किमतीत ही व्यवस्था बनवून ठेवण्याचे दृढ संकल्प हे प्रमुख तत्व आहे. जेव्हाही अस्पृश्य यात थोडासा बदल करण्यासाठी प्रयत्न करतात, तेव्हा हिंदू त्याला दडपून टाकण्यासाठी प्रत्येक पातळीवरचे हातखंडे वापरण्यासाठी तयार असतात.[vi] कारण हिंदू अस्पृश्यतेचे पालन करतो यासाठी की, धर्म त्याला तसे सांगतो आणि धर्म त्याला हे शिक्षण देते की, सामाजिक व्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी केलेले कोणतेही कर्म पाप - कर्म नाही.[vii] धर्मानेच अस्पृश्यांना अध: प्राणी बनविले आहे. हिंदू म्हणतात की, अस्पृश्य हिंदू आहेत परंतु असे असूनही एका अस्पृश्याचे शवदहन हिंदूंच्या स्मशानात केले जाऊ शकत नाही. अस्पृश्य हिंदू आहेत, त्यांना दुसऱ्यासारखे सर्व अधिकार प्राप्त आहेत. परंतु त्यांना ते अधिकार प्राप्त होऊ शकत नाहीत, जे हिंदू समाजव्यवस्थेच्या नियमांच्या आड येतात.[viii] हिंदू अस्पृश्यासोबत असा व्यवहार करतात, जसे अस्पृश्यांचा जन्मच हिंदूंची सेवा करण्यासाठी झालेला आहे. जसे की अस्पृश्यांचे कर्तव्यच सेवा करणे आहे.[ix] अस्पृश्यता ही मुख्यतः धर्मावर आधारित आहे आणि यापासून हिंदूंना आर्थिक लाभ मिळतो. जेव्हा केव्हा सामाजिक आणि आर्थिक हिताची बाबा असते तेव्हा काहीही पवित्र आणि अपवित्र राहता नाही. हे हित काळ आणि परिस्थितीनुसार बदलत राहतात. आणि बाबासाहेब गुलाम प्रथा नष्ट झाली मात्र अस्पृश्यता नष्ट न होण्यापाठीमागचे महत्वाचे कारण हेच संबोधतात. बाबासाहेबांच्या दृष्टीने अस्पृश्यता तेव्हाच नष्ट होईल जेव्हा संपूर्ण हिंदू समाजव्यवस्था विशेषतः जातीव्यवस्था नष्ट होईल. कारण अस्पृश्यता जातिव्यवस्थेचा परिमाण आहे.

**संदर्भ:**

---


- बाबासाहेब डॉ .आंबेडकर संपूर्ण वाङमय, खंड 9, डॉआंबेडकर प्रतिष्ठान ., सामाजिक न्याय और
- अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, 2024, पृष्ठ क्र. 35
- द इसेंन्सियल अंबेडकर , भालचंद्र मुणगेकर (संपा.), रूपा पब्लिकेशन, नई दिल्ली, 2019,
- पेज न. 35
- उपरोक्त, बाबासाहेब डॉ .आंबेडकर संपूर्ण वाङमय,, खंड 9, 38
- कित्ता, 40
- कित्ता, 49
- कित्ता, 65
- कित्ता, 142
- कित्ता, 80
- कित्ता, 92